PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Maherchi Manse
Year: 1984
Song: Tithe Nande Shambhu
Lyricist: Sudhir Moghe

बारा पुण्यक्षेत्री बारा लिंगे बारा ज्योती
तिथे नांदे शंभू कैलासाचा पती
तिथे नांदे शंभू कैलासाचा पती
बारा पुण्यक्षेत्री बारा लिंगे बारा ज्योती
तिथे नांदे शंभू कैलासाचा पती
तिथे नांदे शंभू कैलासाचा पती

दक्ष शापे चंद्र पुरा कोमेजला
दक्ष शापे चंद्र पुरा कोमेजला
शिवकृपा योगे पुन्हा तेजाळला
ज्योर्तिलिंग हे पहिले ब्रम्हदेवे स्थापियले
सोरटीचा सोमनाथ नामे याची ख्याती
तिथे नांदे शंभू कैलासाचा पती
तिथे नांदे शंभू कैलासाचा पती

श्री शैलगिरी शिखरी
शिवतेज वास करी
श्री शैलगिरी शिखरी
शिवतेज वास करी
सती चंद्रावती साठी इथे आले उमापती
सती चंद्रावती साठी इथे आले उमापती
शैल मल्लिकार्जुन गुण भक्तजन गाती
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती

दैत्य दूषण करी निर्दालन
हुंकाराने त्रिपुरारी
दैत्य दूषण करी निर्दालन
हुंकाराने त्रिपुरारी
तोच रूद्र सहज होय गवळ्याचा कैवारी
तोच सांब झालासे
तोच सांब झालासे
महाकालेश्वर क्षिप्रा काठी
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती

ओंकार होऊन ये चंद्रमाऊली
ओंकार होऊन ये चंद्रमाऊली
विंध्याद्रीची कामना पूर्ण झाली
ओंकारतो जाण हा अमलेश्वर
हीच जाण शिवकुटी
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती

रावणासी फसवूनी गजाननी वाचविले
ते हे ज्योर्तिलिंग वैजनाथ
रावणासी फसवूनी गजाननी वाचविले
ते हे ज्योर्तिलिंग वैजनाथ
देवांचे ही धन्वंतरी
ज्याच्या मध्ये प्रवेशले
ते हे ज्योर्तिलिंग वैजनाथ
छाये परी जिथे आहे संगती पार्वती
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती

भीम नामे दानवाने
ब्रम्हदेवाच्या वराने
केले साऱ्या जगातासी त्राही त्राही त्राही

भीम नामे दानवाने
ब्रम्हदेवाच्या वराने
केले साऱ्या जगातासी त्राही त्राही त्राही
संहाराया त्या दैत्यासी
घेई भीम स्वरूपासी
हर विश्व व्यापुनी या राही राही राही
भीमाशंकराचे ठायी
नदी भीमा जन्म घेई
वनी डाकिनीया शंकराच्या अभिषेकासाठी
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती

जानकीने रचियले
जानकीने रचियले
वालुकालिंग हे श्रीरामाने स्थापियले
जानकीने रचियले
जानकीने रचियले
भाविकास साधकास
नित देत आस
उभा सेतू मध्ये रामेश्वर कटी
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती

ब्रम्हावाणी ठरू नये खोटी
याच्यासाठी इथे शिव भस्मसात झाले हो
ब्रम्हावाणी ठरू नये खोटी
याच्यासाठी इथे शिव भस्मसात झाले हो
त्याच भस्मातून फिरूनिया
तेजाळून तिथे ज्योर्तिलिंग प्रकटले हो
औंढा नागनाथ जळा वसे सदा येथ
नागजनासाठी तेच तया त्रिकाळी पूजिती
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती

कैलास सोडून ये सांब भोळा
कैलास सोडून ये सांब भोळा
भुलला कसा या वाराणशीला
विश्वेश्वर शिव क्षेत्र सदैव स्मर्
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती

गोदावरी कटी एका ठायी नांदताती
तिघे ब्रम्हा विष्णू महेश
ब्रम्हा विष्णू महेश
ब्रम्हा विष्णू महेश
वैकुंठचतुर्दशी त्रिपुरीपौर्णिमा
आणि महाशिवरात्रीस
भक्त लोटती भावे भजती
त्रिनेत्र ज्योर्तिलिंगास
त्र्यंबकेश्वर महती जगती वर्णावी किती किती
नांदे शंभूकैलासाचा पती
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती

गंगाधरा गंगाधरा
गिरीजाहरा
अभयंकरा नितजास्मरा
गंगाधरा
केदारनाथ कर्पूरगौर
शिव निळकंठ सुख शांती देत
भवदुःख दूर करी विश्वनाथ
केदारनाथ केदारनाथ
परतत्व येथ पावेल शांती

Literacy for a Billion

तिथे नांदे शंभूकैलासाचा पती
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती

श्री घृष्णेश्वर वेरूळ गावी
काय तयाची महती गावी
श्री घृष्णेश्वर वेरूळ गावी
काय तयाची महती गावी
श्री घृष्णेश्वर वेरूळ गावी
विरह न साहे कैलासाला
लेणे होऊन समीप आला
विरह न साहे कैलासाला
लेणे होऊन समीप आला
ग्रहणकाली शिव पावन वेडी
ग्रहणकाली शिव पावनवेडी
शिवभक्तांची दाटी
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती
बारा पुण्यक्षेत्री बारालिंगे बाराज्योती
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती
तिथे नांदे शंभूकैलासाचा पती

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*